आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

६ सप्टेंबर २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत आणि अमेरिका संबंधांबाबत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भूमिकेचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून स्वागत

- जीएसटी दरकपातीनं जीडीपीत २० लाख कोटी रुपयांची भर पडेल, असा विश्वास केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडून व्यक्त

- ‘पुढच्या वर्षी लवकर या’ च्या गजरात सर्वत्र गणपतीबाप्पाला भावपूर्ण निरोप

- आशिया करंडक हॉकी स्पर्धेत सुपर फोरमध्ये भारताचा चीनविरुद्ध सामना सुरू

**आणि**

- यूएस ओपनच्या महिला एकेरीचा अंतिम सामना अनिसिमोव्हा आणि सबालेंका यांच्यात रंगणार

**<><><><><>**

भारत आणि अमेरिका यांच्यात अतिशय सकारात्मक, दूरदृष्टीपूर्ण, व्यापक आणि जागतिक धोरणात्मक भागीदारी आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी उभय देशांमधल्या संबंधांबद्दल केलेल्या विधानावर त्यांनी आज समाज माध्यमावर प्रतिक्रिया दिली आहे. ट्रम्प यांनी अतिशय संवेदनशील आणि सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी त्यांचं कौतुक केलं.

भारत आणि अमेरिका यांच्यातले संबंध विशेष असून त्याबाबत चिंता करण्यासारखं काही नाही असं ट्रम्प यांनी काल प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं होतं. नरेंद्र मोदी हे एक श्रेष्ठ प्रधानमंत्री असून ते आपले कायमच चांगले मित्र राहतील, असंही ट्रम्प म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची राष्ट्रपती भवनात भेट घेतली. तसंच फ्रान्सचे अध्यक्ष एमॅन्युएल मॅक्रॉन यांच्याशी मोदी यांनी दूरध्वनीद्वारे चर्चा केली. द्विपक्षीय संबंध, युक्रेन युद्धासह आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक मुद्द्यांवर यावेळी चर्चा झाल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. फेब्रुवारीमध्ये भारतात होणाऱ्या AI परिषदेसाठी प्रधानमंत्र्यांनी मॅक्रॉन यांना आमंत्रण दिलं.

**<><><><>**

जीएसटीतल्या दरकपातीमुळं कृषी क्षेत्रावर मोठा सकारात्मक परिणाम होईल, असं केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान आज म्हणाले. यामुळं कृषी क्षेत्रातला उत्पादन खर्च कमी होईल आणि शेतकऱ्यांचा नफा वाढेल, असा विश्वास त्यांनी भोपाळमध्ये वार्ताहरांशी बोलताना व्यक्त केला.

**<><><><>**

जीएसटी सुधारणेमुळे देशाच्या जीडीपीत २० लाख कोटी रुपयांची भर पडणार असून यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल, असा विश्वास माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलताना व्यक्त केला. हा मध्यमवर्गासाठी मोठा दिलासा असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. ते म्हणाले,

***होल्ड... बाईट अश्विनी वैष्णव***

गेल्या अकरा वर्षांत इलेक्ट्रॉनिक उत्पादनात ६ पट वाढ झाली असून इलेक्ट्रॉनिक क्षेत्र हे देशातलं अव्वल दर्जाचं क्षेत्र म्हणून उदयाला येत असल्याचं अश्विनी वैष्णव यावेळी म्हणाले. गेल्या दशकभरात इलेक्ट्रॉनिक उत्पादन निर्यातीत आठपट वाढ झाली असून या क्षेत्रामुळे २५ लाखांहून अधिक जणांना रोजगार मिळाल्याचं ते म्हणाले. आवश्यक असलेल्या प्रत्येक इलेक्ट्रॉनिक वस्तूचं उत्पादन आता देशात केलं जात आहे, असं वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><><>**

जीएसटी सुधारणांमुळे सहकार क्षेत्राला बळकटी मिळणार असून उत्पादनात आणि मागणीत वाढ होईल, यामुळे सहकार क्षेत्राचं उत्पन्न वाढेल, असं सरकारनं म्हटलं आहे. सहकार, शेती, ग्रामीण उद्योग तसंच दहा कोटींहून अधिक दूध उत्पादनांना फायदा होईल, अशा महत्त्वाच्या क्षेत्रात जीएसटी कपात करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. शेती आणि पशुपालन क्षेत्रातल्या सहकारी संस्थांना याचा लाभ होईल, तसंच शाश्वत शेतीला प्रोत्साहन मिळेल, असंही सरकारचं म्हणणं आहे.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेनं जीएसटीच्या दरांमध्ये केलेली कपात येत्या २२ तारखेपासून लागू होणार आहे. यामुळं दैनंदिन वापराच्या अनेक वस्तूंवरचा कर कमी होणार आहे. याबद्दल अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड… व्हीसी-(भक्ती)***

*(विविध प्रकारची सौंदर्यप्रसाधनं, केसांला लावायचं तेल, शॅम्पू, टूथपेस्ट, टूथब्रश या वस्तूंवरचा जीएसटी १८ टक्क्यांवरून ५ टक्क्यांवर येईल. दात घासायच्या पावडरवरचा जीएसटी १२ टक्क्यांवरून ५ टक्के होईल. कंगवे, केसांसाठी लागणारं साहित्य इत्यादींवरचा १२ टक्के जीएसटी आता ५ टक्के इतका कमी केला आहे. दाढी करण्याचं सामान आणि साबणावर आता १८ टक्क्यांच्या ऐवजी ५ टक्के जीएसटी द्यावा लागेल. रबरबँड्स, विविध पद्धतीचं चामडं, हाताने तयार केलेल्या वस्तू, पिशव्यांवर लागणारा १२ टक्के जीएसटी ५ टक्के होईल. पेन्सिली, रंगीत खडू, जलरंग, खडू इत्यादी साहित्यावर यापुढे कोणताही जीएसटी द्यावा लागणार नाही.)*

**<><><><>**

**इंट्रो-**

राज्यभरात आज अनंत चतुदर्शीच्या मुहुर्तावर गणेश विसर्जनानं गणेशोत्सवाच्या मंगल पर्वाची सांगता होत आहे. त्यासाठी राज्यभरात स्थानिक प्रशासनानं चोख व्यवस्था केली आहे. अनेक ठिकाणी कृत्रिम तलावांमध्ये गणपतींचं विसर्जन होतं आहे, तर काही ठिकाणी मूर्तीदानही केलं जात आहे. गणपतींचं दर्शन घेण्यासाठी आणि विसर्जन मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी दिसून येत आहे. विसर्जन मिरवणूक चोख पार पडावी यासाठी पोलिस यंत्रणाही सज्ज आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधींकडून...

***होल्ड... व्हॉइस कास्ट (कौस्तुभ)***

*'गणपतीबाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या गजरात आज राज्यभर लाडक्या बाप्पाला निरोप दिला जात आहे.*

***मुंबई**त दुपारीच लालबागच्या राजाची विसर्जन मिरवणूक सुरू झाली. मंडपात दर्शन न मिळालेल्या भाविकांनी विसर्जन मार्गावर दर्शनासाठी गर्दी केली आहे. गणेश गल्लीतला मुंबईचा राजा, तेजुकाया मॅन्शनचा तेजुकाया गणपती, चिंचपोकळीचा चिंतामणी, गिरगाव इथं खेतवाडीचा राजा, गिरगावचा राजा, अंधेरीचा राजा, केशवजी नाईक चाळीतला मंगलमूर्ती गणराया यासह विविध लोकप्रिय गणेश मंडळांची विसर्जन मिरवणूक सुरू आहे. मुंबई महापालिकेनं गिरगाव, जुहू यासारख्या चौपाट्यांसह ७० नैसर्गिक स्थळं आणि सुमारे २९० कृत्रिम तलावांमध्ये विसर्जनाची सोय केली आहे. सहा फुटापेक्षा कमी उंचीच्या मूर्तींचं विसर्जन कृत्रिम तलावात करावं, असं आवाहन पालिकेनं केलं आहे. १० हजारांहून अधिक कर्मचारी, जीवरक्षक विसर्जनस्थळांवर तैनात आहेत. १८ हजाराहून अधिक पोलीसही ठिकठिकाणी तैनात केले आहेत. याशिवाय १० हजार सीसीटीव्ही कॅमेरे आणि ड्रोनच्या माध्यमातूनही विसर्जन सोहळ्यावर लक्ष ठेवण्यात येत आहे. आज समुद्रात भरती असल्यानं तसंच जेलीफिश आणि स्टिंगरेचा धोका असल्यानं विशेष काळजी घेण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे.*

***पुण्या**त मानाच्या पाचही गणपतींचं विसर्जन पूर्ण झालं असून इतर गणपतींचं विसर्जन सुरू आहे. ढोल-ताशांच्या तालावर, लेझीमच्या झंकारात आणि गुलालाची उधळण करत श्रद्धाळू मोठ्या संख्येनं सहभागी झाले आहेत. कसबा गणपतीच्या मिरवणुकीत यंदा दिव्यांग मुलांच्या पथकानं वादन सेवा सादर केली. मातीच्या मूर्तींचं कुंडांमध्ये विसर्जन करण्यासाठी नागरिकांचा सहभाग यंदा वाढलेला आहे.*

***नागपुरा**त महापालिकेनं सर्व तलावांमध्ये गणेशमूर्तींच्या विसर्जनाला मनाई केली आहे. भाविकांच्या सोयीसाठी २१६ ठिकाणी एकूण ४१९ कृत्रिम विसर्जन तलावाची व्यवस्था करण्यात आली आहे.*

याशिवाय राज्यभरातही जल्लोषात गणेश विर्सजन मिरवणूक सुरु आहे.

**<><><><><>**

आशिया करंडक हॉकी स्पर्धेत सुपर फोरमध्ये भारताचा सामना चीनविरुद्ध सुरू आहे. आत्तापर्यंत भारतानं एका सामन्यात विजय मिळवला आहे, तर दुसरा सामना अनिर्णित राहिला आहे. सुपर फोरच्या गुणतालिकेत भारत सध्या पहिल्या क्रमांकावर आहे. या संपूर्ण स्पर्धेत भारत अजेय राहिल्यानं आशिया करंडकासाठी प्रबळ दावेदार मानला जात आहे. सुपर फोरच्या दुसऱ्या सामन्यात आज कोरियानं मलेशियावर ४-३ अशी मात केली.

<><><><><>

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत महिला एकेरीत अमांडा अनिसिमोव्हा आणि अग्रमानांकित अरीना साबालेंका एकमेकींविरुद्ध मैदानात उतरणार आहेत. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री साडेबारा वाजता हा सामना सुरू होईल.

दरम्यान, पुरुष एकेरीच्या उपांत्य सामन्यात यानिक सिनर यानं फीलिक्स ऑजर अलियासीम याच्यावर ६-१, ३-६, ६-३, ६-४ अशी मात करून अंतिम फेरीत प्रवेश केला. अजिंक्यपदासाठी त्याचा सामना कार्लोस अल्काराज याच्यासोबत होईल. कार्लोस यानं नोव्हाक जोकोविचवर ६-४, ७-६, ६-२ असा विजय मिळवला.

<><><><><>

दक्षिण कोरियात सुरू असलेल्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी पुरुष आणि मिश्र संघानं कंपाऊंड प्रकाराच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्यामुळं भारताची २ पदकं निश्चित झाली आहेत. उद्या अंतिम फेरीत भारताचा सामना फ्रान्सविरुद्ध होईल.

<><><><><>

उत्तराखंडच्या उत्तरकाशी जिल्ह्यात आज संध्याकाळी अचानक झालेल्या मुसळधार पावसामुळे, नौगाव ओढ्याला पूर आला. यामुळे काही घरांमध्ये पाणी शिरलं असून रस्त्यावर लावलेली काही वाहनंही पाण्यात वाहून गेली आहेत.

//<><><><><>//